CNR No.MHST090005492014

दाखल तारीख : १०.०६.२०१४
नोंदणी तारीख: १०.०६.२०१४
निकाल तारीख: १५.०७.२०२६

| कालावधीः | वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|---|
| | १२ | ०१ | ०५ |

**कोरेगाव येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कोरेगाव यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : **पी.डी.यवतकर**)

**नियमित दिवाणी दावा क्र.१४९/२०१४** **निशाणी क्र. ५९**

वादी : १) **श्रीमती सखुबाई उर्फ शकुंतला निवृत्ती चव्हाण**
वय–६० वर्षे, धंदाः शेती,

२) **श्री.विलास निवृत्ती चव्हाण**
वय–३० वर्षे, धंदाः शेती,
दोघे रा.जळगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा.

विरूध्द

प्रतिवादी : १) **श्रीमती शोभा महादेव मदने**
**जी स्वतः शोभा तुकाराम चव्हाण म्हणविते ती**
वय– ५८ वर्षे, व्यवसाय–घरकाम,

२) **श्री.अमित महादेव मदने**
**जो स्वतः अमित तुकाराम चव्हाण म्हणविते तो**
वय– ३५ वर्षे, व्यवसाय–शेती,

३) **सोनाली महादेव मदने**
वय– १६ वर्षे, व्यवसाय–शिक्षण,

४) **मोनाली महादेव मदने**
वय– १४ वर्षे, व्यवसाय–शिक्षण,
प्रतिवादी क्र.१ ही प्रतिवादी क्र.३,४ यांचेसाठी अ.पा.क म्हणून ज्यांना प्रतिवादी क्र.१ सोनाली तुकाराम चव्हाण, मोनाली तुकाराम चव्हाण म्हणविते त्या.
रा. प्रतिवादी क्र.१ ते ४ मुळ रा. आदर्की, ता.फलटण, जि.सातारा.
हल्ली रा.सरकारी दवाखान्याजवळ तडवळे सं कोरेगाव,
ता.कोरेगाव, जि.सातारा.

५) **श्री.युवराज जयसिंग पाटील**
वय– ३२ वर्षे, व्यवसाय–शेती,
रा.जळगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा.

.............................................................................................................

वादीतर्फे विधिज्ञ – श्री.एस.जी.मुलाणी, विद्वान वकील
प्रतिवादी क्र.१, २ व ५ – दावा विना कैफियत चालविण्यात आला.
प्रतिवादी क्र.३ व ४ – दावा एकतर्फा चालविण्यात आला.

.............................................................................................................

## न्यायनिर्णय

(ता. १५/०७/२०२६ रोजी घोषित केला)

वादी यांनी सदरचा दावा हा मयत तुकाराम यांचे कायदेशीर वारस म्हणून वारसा व मालकी हक्क प्राप्त होत असलेबाबत जाहीर ठराव व प्रतिवादींनी वाद मिळकतीवर हरकत अडथळा करु नये अशी निरंतरची ताकीद मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२) वादी यांनी आपल्या दाव्यामध्ये कथन केलेले आहे की, १) मौजे जळगांव ता. कोरेगांव येथील गट नं. ७२ क्षेत्र ९२ आर, आकार १० रू. ५० पैसे ही संपूर्ण मिळकत

पैकी हिस्सा ५ आणे ४ पै जो सध्या प्रतिवादी नं. १ ते ४ यांचे नावे नमूद आहे, सदरची मिळकत त्यातील झाडझूड तदंगभूत वस्तूसह व या मिळकतीच्या वारसाहक्क हा या दाव्याचा वाद विषय आहे .

३) वादीने पुढे कथन केले की, वर नमूद दावा मिळकत ही वादी नं. १ ची वडिलार्जित मालकी वहिवाटीची होती व आहे. तसेच वादी नं. २ हा प्रतिवादी नं. १ चा मुलगा आहे. वादी नं. १ चे वडील श्री. कोंडीबा परबती शिडतुरे यांनी या मिळकतीबाबत दि. ०१/०३/१९८७ ला रजिस्टर्ड मृत्यूपत्र करून सदरची मिळकत मालकी हक्काने वादी नं. १ चा मयत मुलगा तुकाराम निवृत्ती चव्हाण याचे नावावर करणेबाबत नमूद करून ठेवले. त्यानुसार सदरची मिळकत वादी नं. १ चा मयत मुलगा तुकाराम निवृत्ती चव्हाण याचे नाव दावा मिळकतीचे रेकॉर्डसदरी दाखल झाले.

४) वादीने पुढे कथन केले की, त्यानंतर वादी नं.१ व मयत तुकाराम हा वादीचा मुलगा यांनी दि. १६/१२/२००५ ला कायदेशीर गरजेसाठी नाममात्र असा खरेदीदस्ताचा कागद ज्ञानदेव शिवराम शिडतुरे या वादी नं. १ चे चुलत भावाचे नावावर केला. तसेच पुन्हा दि. ११/१२/२००७ ला ज्ञानदेव शिवराम शिडतुरे यासच याच गट नं. ७२ पैकी ३० गुंठे चा हिस्सा गहाण दिला. या दोन्ही दस्तांबाबत वादी पुढे जाऊन मिळकत गहाणमुक्तीचे व्यवहार यथावकाश करणार आहेतच. या दस्तांनुसार नाव नोंदीही झाल्या आहेत. एकूणच वादी हे आपले मालकी हक्क अनुसार गट नं. ७२ ही मिळकत वापरत आहेत व त्याचा उपभोग घेत आहेत.

५) वादीने पुढे कथन केले की, त्यानंतर वादी नं. १ यांचे विरुध्द सरूबाई गोविंद बोडरे हिने याच मे. कोर्टात रे.दि.मु.नं. १८१/९२ हा दावा वाटप कब्जासाठी केला असून त्याचे कामकाज प्रलंबित आहे. या सरूबाई गोविंद बोडरे यांनीही प्रकाश भिलारे यास गट नं. ७२ चे गहाणपत्र नाव नोंदीचा गैरफायदा घेऊन दिलेचे वादींना नुकतेच समजले आहे. वादी त्याबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई सरूबाई बोडरेचे विरुद्ध करणार आहेत. या वस्तुस्थितीवरून वादींनाच या गट नं. ७२ बाबत पूर्णपणे मालकी हक्क होता व आहे, हे स्पष्ट होत आहे. सद्यस्थितीत प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी गावकामगार तलाठी यांचेशी संगनमत करून बेकायदेशीरपणे व लबाडीने ५ आणे ४ पै च्या हिस्यास प्रतिवादी नं. १ ते ४ यांची अनाधिकाराची नोंद केलेमुळे प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादी नं. १ ते ४ यांचेविरुद्ध केला आहे.

६) वादीने पुढे कथन केले की, वादी नं.१ चा मयत मुलगा तुकाराम निवृत्ती चव्हाण हा अविवाहीतच दि. ३०/०५/२०१० ला मयत झाला असून, त्याचा खून झाला. त्यानंतर वादी नं. १ चा मयत मुलगा तुकाराम निवृत्ती चव्हाण याचे नावास कंस करून गावकामगार तलाठी जळगांव यांनी अमित तुकाराम चव्हाण, सोनाली व मोनाली तुकाराम चव्हाण अ.पा.क. शोभा तसेच शोभा तुकाराम चव्हाण अशी बनावट व खोटी वारस नोंद केली आहे. याबाबत वादींना नुकताच ७/१२ चा उतारा घेतला असता कळून आले. त्यानंतर वादी नं. १ ने सदरची माहिती मिळताच याबाबत तहसिलदार कोरेगांव यांना कायदेशीर नोटीस दि. २/१२/२०१३ रोजी पाठवून सदरची नाव नोंद खोटी व बनावट

असलेले तसेच या नाव नोंदीने दाखल इसमांचा या मिळकतीशी काहीही हक्क, अधिकार, हितसंबंध नसलेचे कळविले. तसेच सदरची खोटी, बनावट, पोकळ नाव नोंद तातडीने कमी करणेबाबत व वादींची नाव नोंद कायदेशीर वारस म्हणून वादमिळकतीच्या रेकॉर्डसदरी करणेस कळविले, वादी नं.१ चा मयत मुलगा तुकाराम यास केवळ वादी नं.१ व २ हेच कायदेशीर वारस होते व आहेत.

७) वादीने पुढे कथन केले की, वादी नं. १ चा मयत मुलगा तुकाराम याने शोभा या नावाच्या कोणत्याही 'स्त्री'शी विवाह केलेला नव्हता व नाही. तसेच वर नमूद केलेली अमित, सोनाली, मोनाली या नावची कोणतीही मुले वादी नं. १ चा मयत मुलगा तुकाराम यास वर नमूद प्रतिवादी नं. १ पासून झालेली नव्हती व नाहीत. एकूणच सदरची वारस नोंद ही बनावट, खोटी व लबाडीची तसेच संगनमताने केलेली आहे. तसेच प्रतिवादी नं.१ ही आपले खरे नाव व पत्ता लपवून बेकायदेशीरपणे रेकॉर्डसदरी नाव नोंद घालून इस्टेटच्या लोभापायी सदरची मिळकत वळकावू पहात आहे. तसेच प्रतिवादी नं.१ या खोट्या, बेकायदेशीर व पोकळ नाव नोदींचा गैरफायदा घेऊन सदरची मिळकत तब्दील करणेची दाट शक्यता आहे.

८) वादीने पुढे कथन केले की, वादी नं.१ ने दावा मिळकतीचा ७/१२ अनेकवेळा गावकामगार तलाठी यांना मागितला असता, गावकामगार तलाठी यांनी सदरचा ७/१२ उतारा देणेस टाळाटाळ केली. त्यानंतर वादी नं. १ ने फारच तगादा लावल्यावर सदरचा ७/१२ उतारा तलाठी यांनी नाविलाजाने वादीस दिला. सदरचा ७/१२ उतारा

पाहिला असता वर नमूद प्रतिवादींची नावे ही फेरफार नं.१७०६ ने नोंदलेली आढळली. वादी नं.१ ने याबाबत सदरचा फेरफार काढून पाहिला असता हा फेरफार जळगांव ता. कोरेगांव येथील गट नं. ५४२ बाबत युनायटेड वेस्टर्न बँक शाखा कोरेगांव यांचेकडून श्री. महादेव आबाजी वर्गे यांनी दि. ०७/०६/१९९१ रोजी घेतलेल्या तारण कर्ज प्रकरणाचा फेरफार असल्याचे स्पष्ट झाले आहे. यावरूनच गावकामगार तलाठी जळगांव यांनी चुकीचा व बेकायदेशीर फेरफार करून बनावट व खोट्या इसमांची नावे वारस नोंद म्हणून गट नं. ७२ वर केली आहेत. वस्तुतः व कायद्याने फेरफाराने परिणाम झालेल्या जमिनीवरच फेरफाराचा अंमल देणे बंधनकारक होते व आहे. तसेच वारस नोंद करणेपूर्वी स्थानिक चौकशी करणे व कागदोपत्री शहानिशा करणे कायद्याने आवश्यक होते व आहे. या दोन्ही बाबतीत बेकायदेशीरपणे व बेधडकपणे गावकामगार तलाठी यांनी चुकीच्या फेरफाराचा चुकीच्या जमिनीवर अंमल देऊन तसेच बेकायदेशीर, खोट्या व चुकीच्या वारस नोंदी करून कायद्याचा भंग केला आहे. तसेच प्रतिवादी नं. १ व २ यांचेशी संगनमत करून गावकामगार तलाठी यांनी खोटे रेकॉर्ड तयार केले आहे. परंतु तहसिलदार कोरेगांव यांनी या बेकायदेशीर व खोट्या नाव नोंदीबाबत कोणतीही कायदेशीर कारवाई न करता दि. २८/०२/२०१४ ला त्याबाबत नोटीस उत्तर पाठवून फेरफार नं. १७०६ ने झालेली वारस नोंद कायदेशीर असलेबाबत कळविले. त्यानंतर वादीने पुन्हा जळगांव ता. कोरेगांव येथील फेरफार नं. १७०६ काढून पाहिला असता त्यात वर नमूद केलेप्रमाणे महादेव आबाजी वर्गे यांचे कर्ज प्रकरणाचा फेरफार असलेबाबतचे स्पष्ट झाले आहे. यावरूनच प्रतिवादी यांनी दावा

मिळकतीच्या रेकॉर्डसदरी केलेली नाव नोंद बेकायदेशीर, चुकीची, खोटी व लबाडीची असलेबाबत स्पष्ट होत आहे.

९) वादीने पुढे कथन केले की, याबाबत वादींनी अधिक चौकशी केली असता, प्रतिवादी नं.१ चे खरे नाव व सासरचा पत्ता वादींना उपलब्ध झाला. तसेच सदरच्या वाद मिळकतीबाबत प्रतिवादी नं.१ हिस कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध नसताना प्रस्तुतची वाद मिळकत ही खोटी, बेकायदेशीर, पोकळ नावनोद घालून अनाधिकाराने तब्दील करायची या हेतूने संगनमताने व व्यापक कटाचा भाग म्हणून प्रतिवादी नं.१ ने खोटे नाव धारण करून प्रस्तुतची नाव नोंद केली असले बाबत वादींना समजले. याबाबत वादी स्वतंत्रपणे संबंधित रेव्हेन्यू अधिकारी व प्रतिवादी यांचेवर फौजदारी कारवाई करीत आहे. परंतु खोट्या, अनाधिकाराच्या, बेकायदेशीर व पोकळ अशा रेकॉर्डसदरी दिसणाऱ्या नाव नोंदीमुळे प्रतिवादींना वाद मिळकतीबाबत कधीही, कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वा वहिवाट प्राप्त झालेली नव्हती व नाही.

१०) वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी नं.१ ते ४ यांनी पोकळ व बेकायदेशीर नाव नोंदी आधारे श्री. युवराज जयसिंग पाटील यांना दावा मिळकत गट नं. ७२ पैकी तथाकथित ५ आणे ४ पै चा हिस्सा तथाकथित खुषखरेदी दस्त रजि. क्र. २१८५/२०१४ दि. ११/०६/२०१४ ला तब्दिल केला. त्याबाबतची माहिती वादीस नुकतीच मिळाली आहे. या दस्तात मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे. भरणा रू. २,०५,०००/–, मौजे जळगांव ता. कोरेगांव येथील क. ग. नं. ७२, एकूण क्षेत्र ९२ आर,

आकार १० रू. ५५ पैसे यांपैकी ५ आणे ४ पै चा हिस्सा क्षेत्र ०=३०.६६ आर यासी चतु:सिमा पुर्वेस : नारायण दादा जाधव, दक्षिणेस : पांडुरंग गेणू शिडतुरे पश्चिमेस : ओढा उत्तरेस : ज्ञानदेव शिवराम शिडतुरे अशा वर्णनाचा व काल्पनिक, खोट्या चतु:सिमांचा पोकळ व बेकायदेशीर तथाकथित खरेदीदस्त प्रतिवादींनी युवराज जयसिंग पाटील यास करून दिला आहे. सदरचा दि. ११/०६/२०१४ चा तथाकथित रजिस्टर खुषखरेदीपात्राचा दस्त हा पोकळ, बेकायदेशीर, बिनकब्जाचा, मुलत: रद्दबातल असा असून तसेच दावा प्रलंबित असताना अनाधिकाराने प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी प्रतिवादी नं. ५ यास तथाकथित ५ आणे ४ पै हिस्याचा गट नं. ७२ पैकी करून दिला असून या दस्ताद्वारे प्रतिवादी नं. ५ यास कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध प्राप्त होत नव्हता व नाही. तसेच सदरचा दि. ११/०६/२०१४ चा रजिस्टर खुषखरेदी दस्त क्र. २१८५/२०१४ हा वादींवर बंधनकारक नाही अशा जाहीर ठरावाची व तद्अनुषंगिक दाद म्हणून प्रतिवादी नं. ५ विरुद्ध निरंतरचे ताकीदीची मागणी दाव्याकामी करणे वादींना भाग पडत आहे.

११) वादीने पुढे कथन केले की, त्याबाबत वादी नं. १ ने तहसिलदार कोरेगांव यांना दि. ०२/१२/२०१३ रोजी रजि. पोस्टाने कायदेशीर नोटीस पाठवून कळविले असतानाही तसेच सदरची नोटीस मिळूनही याबाबत गावकामगार तलाठी वा इतर प्रतिवादींवावत कोणतीही कारवाई तहसिलदार कोरेगांव यांनी केलेली नाही. याउलट दि. २८/०२/२०१४ ला त्याबाबत नोटीस उत्तर पाठवून हा फेरफार कायदेशीर असल्याचे कळविले. प्रतिवादींचा या वादमिळकतीशी कोणत्याही प्रकारे हक्क अधिकार हितसंबंध

नसलेमुळे वाद मिळकतीबाबत मयत तुकारामचे कायदेशीर वारस म्हणून केवळ वादींनाच वारसा येतो या जाहीर ठरावासाठी व प्रतिवादींनी स्वतः वा इतरांमार्फत वाद मिळकतीतील वादींच्या मालकी हक्काने असणाऱ्या कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा करू नये म्हणून निरंतरचे ताकीदीसाठी दाखल करणे भाग पडत आहे. सदरचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी पोकळ व बेकायदेशीर नावनोदी आधारे श्री. युवराज जयसिंग पाटील यांना दावा मिळकत गट नं. ७२ पैकी तथाकथित ५ आणे ४ पै चा हिस्सा तथाकथित खुषखरेदी दस्त रजि. क्र. २१८५/२०१४ दि. ११/०६/२०१४ ला तब्दिल केला. त्यामुळे सदरचा तथाकथित रजिस्टर खुषखरेदी दस्त क्र. २१८५/२०१४ दि. ११/०६/२०१४ चा दावा मिळकत गट नं. ७२ मधील ५ आणे ४ पै हिष्याबाबतचा दस्त हा बेकायदेशीर व मुलतः रद्दबातल असून तो वादींवर बंधनकारक नाही अशा जाहीर ठरावाची मागणी व तद्अनुषंगिक दाद म्हणून निरंतरचे ताकीदीची मागणी प्रतिवादी नं. ५ विरुद्ध करणेस वादींनी याबाबतच्या ७/१२ वरील नोंदीवरून फेरफार नं. १७१० ता. ०२/०२/२०१५ रोजी काढला त्यावेळेस कारण घडले आहे. म्हणून वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

**१२)** प्रतिवादी क्र.१, २ हे दिनांक १५/०७/२०१४ रोजी व प्रतिवादी क्र.५ हे दिनांक २९/०८/२०१५ रोजी वकीलांमार्फत हजर झाले, परंतु त्यांनी त्यांची कैफियत मुदतीत दिली नाही म्हणून त्यांचे विरुध्द दिनांक २५/०८/०१४ व १०/०८/२०१६ रोजीच्या नि.क्र.१ वरील आदेशान्वये त्यांच्या विरुध्द दावा विना कैफियत चालविण्यात आला. तसेच प्रतिवादी क्र.३ व ४ यांना दाव्याचे समन्सची बजावणी होवूनही ते दाव्याचे

कामी हजर राहिले नाही म्हणून त्यांचे विरुध्द दिनांक २३/१०/२०२१ रोजीच्या नि.क्र.१ वरील आदेशान्वये दावा एकतर्फा चालविण्यात आला.

**१३)** वादी पक्षातर्फे विधिज्ञ श्री.एस.जी.मुलाणी यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीचे वकीलांना पुकारले असता, ते गैरहजर त्यामुळे त्यांचा युक्तिवाद नाही. अभिलेखाचे अवलोकन केले. मी दाव्यातील विषयाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे मुद्दे निश्चित करुन त्यावरील माझे निष्कर्ष पुढील कारणांकरीता प्रत्येक मुद्दांचे समोर लिहिलेले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १) | वादी हे सिध्द करतात का की, मयत तुकाराम निवृत्ती चव्हाण हे अविवाहीत असतानाच दिनांक ३०/०५/२०१० रोजी मयत झाले ? | .... | नकारार्थी |
| २) | वादी हे सिध्द करतात का की, मयत तुकाराम निवृत्ती चव्हाण यांचे केवळ वादी क्र.१ व २ हेच कायदेशीर वारस आहेत? | .... | नकारार्थी |
| ३) | वादी हे सिध्द करतात का की, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या नावे झालेली वारस नोंद व फेरफार क्र.१७०६ ही बनावट, खोटे व बेकायदेशीर आहेत ? | .... | नकारार्थी. |
| ४) | वादी हे सिध्द करतात का की, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी प्रतिवादी क्र.५ यांच्या बाजूने केलेला खरेदीदस्त रजिस्टर क्र.२१८५/२०१४ हा बेकायदेशीर, पोकळ व वादींवर बंधनकारक नाही ? | .... | नकारार्थी. |

५) वादी हे सिध्द करतात का की, दावा मिळकतीवर त्यांचाच पूर्ण कायदेशीर मालकी हक्क आणि वहिवाट आहे ? .... नकारार्थी

६) वादी हे मागितल्याप्रमाणे जाहीर ठराव आणि कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहेत का ? .... नकारार्थी.

७) काय खर्च, आदेश व हुकूमनामा ? .... दावा खारीज करण्यात येतो.

## कारणमिमांसा

**१४)** वादींनी आपले दाव्यातील कथनांचे पृष्ठर्थ वादीतर्फे सा.क्र.१ विलास निवृत्ती चव्हाण यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.४७ प्रमाणे दाखल केलेला आहे. वादीतर्फे सा.क्र.२ मानसिंग श्रीपती शिडतुरे यांची नि.क्र.५४ प्रमाणे साक्ष नोंदविलेली आहे. वादीने सदर दाव्यात कागदोपत्री पुरावा म्हणून दावा मिळकत गट नं.७२ चा ७/१२ उतारा नि.क्र.८ वर, फेरफार क्र.१७०६ ची प्रत नि.क्र.९ वर, कोंडिबा परबती शिडतुरे यांनी करुन ठेवलेला मृत्युपत्राची मुळ प्रत नि.क्र.५५ वर, रजिस्टर पोस्टाची पोहोच पावतीची प्रत नि.क्र.५७ वर, तहसिलदार कोरेगाव यांना पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत नि.क्र.५८ वर, दाखल केलेली आहेत.तसेच, पुराव्याअंती वादींनी त्यांचा तोंडी पुरावा नि.क्र.५६ वरील पुरसिस प्रमाणे बंद केलेला आहे.

**मुद्दे क्र. १ ते ६ करिताः–**

**१५)** सदरील दाव्यामध्ये वादी क्र.१ सखुबाई उर्फ शकुंतला निवृत्ती चव्हाण व वादी क्र.२ विलास निवृत्ती चव्हाण यांनी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या विरुध्द सदरील दावा

दाखल करुन असे कथन केले आहे की, वाद मिळकत मौजे जळगाव, ता.कोरेगाव येथील गट क्र.७२, क्षेत्र ९२आर पैकी ५आणे ४पै चा हिस्सा जो सध्या प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या नावे नमूद आहे. सदरील प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची सदरील गट क्र.७२ ला बेकायदेशीरपणे व लबाडीने नोंद झालेली आहे. सदरील झालेली नोंद ही वादीवर बंधनकारक नसून त्याचप्रमाणे दावा दाखल असताना प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी प्रतिवादी क्र.५ यांना बेकायदेशीर खरेदीपत्राआधारे सदील वाद मिळकत विक्री केली, सदरील खरेदीखत देखील वादींच्या हिश्यावर बंधनकारक नाही असे घोषित करुन वाद मिळकतीबाबत मयत तुकाराम चव्हाण यांचे कायदेशीर वारस म्हणून केवळ वादींनाच वारसा हक्क व मालकी हक्क प्राप्त होतो असा जाहीर ठराव मिळावा व प्रतिवादींनी सदरील वाद मिळकतीतील मालकी हक्काने वादीच्या असणा-या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा निरंतर ताकीदीचा हुकूम मिळण्याबाबत सदरील दावा वादींनी प्रतिवादी विरुध्द दाखल केलेला आहे.

१६) वादींनी याठिकाणी दाव्यामध्ये असे कथन केले आहे की, मयत तुकाराम निवृत्ती चव्हाण हा वादी क्र.१ चा मुलगा असून सदरील वाद मिळकत ही वादी क्र.१ चे वडील कोंडीबा परबती शिडतुरे यांनी सदरील मिळकतीबाबत दिनांक ०१/०३/१९८७ रोजी रजिस्टर मृत्युपत्र करुन सदरची मिळकत मालकी हक्काने वादी क्र.१ चा मुलगा मयत तुकाराम निवृत्ती चव्हाण याच्या नावावर केली. त्यानुसार वाद मिळकत वादी क्र.१ चा मुलगा तुकाराम याच्या नावे रेकॉर्डसदरी लागली. त्यानंतर वादी क्र.१ व मयत तुकाराम यांनी दिनांक १६/१२/२००५ रोजी कायदेशीर गरजेसाठी नाममात्र असा खरेदीदस्ताचा

कागद ज्ञानदेव शिवराम शिडतुरे या वादी क्र.१ च्या चुलत भावाच्या नावावर केला, तसेच पुन्हा दिनांक ११/१२/२००७ रोजी ज्ञानदेव शिवराम शिडतुरे यालाच या गटातील ३० गुंठे हिस्सा गहाण दिला. या दोन्ही दस्तांबाबत वादी पुढे जावून गहाण मुक्तीचे व्यवहार करणार आहे. या दस्तांनुसार नोंदीही झालेल्या आहेत, त्याचप्रमाणे वादी क्र.१ हिच्या विरुध्द सरुबाई बोडरे हिने रे.दि.मु.नं.१८१/१९९२ हा दावा वाटपाचा व कब्जाचा दाखल केला आहे. यावरुन वादी या गट क्र.७२ बाबत मालकी हक्क आहे असे स्पष्ट होते. असे असतानाही प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी तलाठी यांच्याशी संगनमत करुन बेकायदेशीरपणे व लबाडीने सदरील वाद मिळकतीच्या ५आणे ४पै च्या हिश्यास स्वतःच्या नावाची नोंद करुन घेतली.

१७) वादीने पुढे असे कथन केले आहे की, वादी क्र.१ चा मयत मुलगा तुकाराम हा अविवाहीत हा दिनांक ३०/०५/२०१० रोजी मयत झाला असून, त्याचा खुन झाला. त्यानंतर तुकाराम चव्हाण याच्या नावावर कंस करुन गावकामगार तलाठी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या नावाची खोटी नोंद करुन ७/१२ सदरी केली. वादींचे असे म्हणणे आहे की, तिचा मयत तुकाराम याने शोभा या नावाच्या कोणत्याही स्त्री सोबत विवाह केला नव्हता, तर इतर प्रतिवादी क्र.२ ते ४ ही मयत तुकाराम यांची मुले नाहीत. त्याचप्रमाणे वादीने असे कथन केले की, प्रतिवादींची नावे फेरफार क्र.१७०६ ने नोंदविलेली आहे. परंतु, सदरील फेरफार काढून पाहिला असता तो गट क्र.५४२ बाबत युनाटेड वेस्टर्न बँक, शाखा कोरेगाव यांच्याकडून श्री.महादेव आबाजी बर्गे यांनी दिनांक ०७/०६/१९९१ रोजी

घेतलेल्या तारण कर्ज प्रकरणाचा आहे. सदरील चुकीच्या फेरफारबाबत वादी यांनी तहसिलदार, कोरेगाव यांच्याकडे हरकत नोंदविली व तहसिलदार, कोरेगाव यांना याबाबत नोटीस देखील पाठविली. परंतु, सदरील तहसिलदार, कोरेगाव यांनी सदरील फेरफाराची नोंद योग्य झाले असल्याचे उत्तर वादींना पाठविल्याचे वादींनी दाव्यात कथन केले आहे.

१८) वादींनी सदरील बाब सिध्द करणेकामी पटलावर वादी क्र.२ विलास निवृत्ती चव्हाण याची साक्ष नि.क्र.४७ प्रमाणे नोंदविली. वादी क्र.२ याने त्याच्या सरतपासात सदरील दाव्यातील कथनाचा पुर्नउच्चार केला तर प्रतिवादी क्र.१, २ व ५ यांनी त्यांचे लेखी कैफियत पटलावर दाखल केली नसून त्यांनी सदरील वादीचा उलटतपास देखील घेतला नाही. तर प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या विरुध्द सदरील दावा एकतर्फा चालला. त्यामुळे वादीचा पुरावा विनाअव्हाणीत राहिला.

१९) वादीने पटलावर सा.क्र.२ म्हणून मानसिंग श्रीपती शिडतुरे यांची साक्ष नि.क्र.५४ प्रमाणे पटलावर नोंदविली. सदरील साक्षीदार हा कोंडीबा परबती शिडतुरे यांनी मयत तुकाराम याच्या नावे सदरील वाद मिळकतीचे लिहून ठेवलेल्या मृत्युपत्रावरील साक्षीदार आहे. त्याने सदरील मृत्युपत्र त्याच्या समक्ष केल्याचे व त्यावर त्याची साक्षीदार म्हणून सही असल्याचे व सदरील मृत्युपत्र नि.क्र.५५ प्रमाणे असल्याचे त्याच्या सरतपासामध्ये मान्य केले. याठिकाणी प्रतिवादी क्र.१, २ व ५ तर्फे उलटतपास घेण्यात आला नाही व प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या विरुध्द दावा एकतर्फा असल्याचे उलटतपास झाला नाही.

२०) वादींनी दिनांक २२/०४/२०२३ रोजी नि.क्र.५६ प्रमाणे पुरावा बंद पुरसीस पटलावर दाखल केली. त्यानंतर प्रतिवादी क्र.१,२ व ५ यांनी त्यांचा पुरावा पटलावर दिला नाही. त्यामुळे दिनांक २८/०४/२०२२ रोजी प्रतिवादींचा पुरावा बंदचा आदेश करण्यात आला.

२१) वरील सर्व वादींचा पटलावरील पुरावा पाहता व दावा पाहता याठिकाणी वादींनी हे सिध्द करणे आवश्यक आहे की, वादी क्र.१ व २ हे मयत तुकाराम यांचे वारस आहेत व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या ७/१२ उता–याला झालेल्या नोंदी या बेकायदेशीर आहेत. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी प्रतिवादी क्र.५ याला सदरील दावा प्रलंबीत असताना करुन दिलेले खरेदीखत देखील वादींवर बंधनकारक नाही.

२२) प्रस्तुत दाव्यामध्ये वादी क्र.१ व २ हे मयत तुकाराम निवृत्ती चव्हाण यांचे कायदेशरी वारस आहेत आणि प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची नावे बेकायदेशीर आहेत हे सिध्द करण्याची जबाबदारी भारतीय पुरावा अधिनियम १८७२ च्या कलम १०१ ते १०३ अन्वये वादी यांच्यावर आहे. वादींनी मयत तुकाराम निवृत्ती चव्हाण यांच्या मृत्युचा दाखला पटलावर दाखल केला नाही. त्याचप्रमाणे वादी हेच मयत तुकाराम यांचे कायदेशीर वारस असल्याचे दर्शविणारे वारस प्रमाणपत्र, वंशावळ, कुटूंब नोंदवही किंवा अन्य कुठलाही सार्वजनिक दस्तऐवज पटलावर दाखल केला नाही. वादी क्र.२ यांनी तोंडी साक्ष मध्ये वादी क्र.१ या मयत तुकाराम यांच्या आई असून ते स्वतः त्यांचे भाऊ असल्याचे कथन केले असले तरी त्या तोंडी साक्षीला पुष्ठी देणारा कुठालाही स्वतंत्र दस्तऐवज पटलावर दाखल

नाही. केवळ वादींनी केलेल्या तोंडी साक्षीच्या आधारे वारसा हक्क घोषित करता येत नाही. त्यासाठी पटलावर स्पष्ट विश्वासहार्य पुरावा असणे आवश्यक आहे. वादी अशाप्रकाराचा पुरावा पटलावर दाखल करण्यास अपयशी ठरलेला आहे.

२३) याउलट, वादग्रस्त मिळकतीच्या ७/१२ उता–यावर प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची वारस म्हणून महसूल अभिलेखात नोंद झालेली आहे. वादींनी सदर नोंद खोटी असल्याचा आरोप केला आहे व वादींचे असे म्हणणे आहे की, वादग्रस्त मिळकतीच्या ७/१२ उता–यावर प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची नावे फेरफार क्र.१७०६ च्या आधारे नोंदविण्यात आली आहे. वादींनी सदरील फेरफारचा उतारा नि.क्र.९ वर दाखल केला असून त्याचे अवलोकन केले असता सदर फेरफार हा प्रत्यक्षात वादग्रस्त गट क्र.७२ बाबत नसून तो महादेव आबाजी बर्गे यांनी युनायटेड वेस्टर्न बँकेकडून घेतलेल्या कर्ज व्यवहारासंबंधी करण्यात आलेल्या नोंदीशी संबंधीत आहे.

२४) वादींनी सदरील फेरफार हा चुकीचा असून त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची वाद मिळकतीला झालेली नोंद बेकायदेशीर आहे असे कथन केले आहे व त्याबाबत तहसिलदार, कोरेगाव यांच्याकडे हरकत घेतल्याचे देखील कथन केले आहे. परंतु, याठिकाणी वादींनी महसूल विभागातील मुळ फेरफार नोंदवही, संबंधीत आदेश, नोंद मंजूर करणा–या अधिका–याची साक्ष किंवा नोंद चुकीने झाल्याचे सिध्द करणारा कोणताही पुरावा पटलावर दाखल केला नाही. याउलट, वादींनी तहसिलदार, कोरेगाव यांच्याकडे हरकत घेतली असता तहसिलदारांनी संबंधीत नोंद योग्य असल्याचे वादींना कळविल्याचे वादींच्या

पुराव्यातून दिसून येते. जरी फेरफार क्रमांक चुकीच्या गट क्रमांकाशी संबंधीत असल्याचे मान्य केले असले तरी यावरुन वादींचा स्वतःचा वारसा हक्क आपोआप सिध्द होत नाही. त्यामुळे केवळ फेरफारातील विसंगतीच्या आधारावर केवळ वादीच वाद मिळकतीचे वारस आहेत असे दिसून येत नाही.

२५) वादींचे दाव्यामध्ये असे कथन आहे की, मयत तुकाराम निवृत्ती चव्हाण याचा कोणत्याही स्त्रीशी विवाह झाला नव्हता आणि ते अविवाहीत मृत्यु पावले, व प्रतिवादी क्र.१ ही तुकाराम याची पत्नी नसून प्रतिवादी क्र.२ ते ४ ही मयत तुकारामची मुले नाहीत. परंतु, वादींनी तिच्या या म्हणण्याला कोणताही स्वतंत्र पुरावा पटलावर दाखल नाही अथवा तुकाराम अविवाहीत मयत झाला असा दाखविणारा कोणताही पुरावा पटलावर दाखल केला नाही. केवळ वादींनी त्यांच्या केलेल्या तोंडी म्हणण्यावरुन तुकाराम हा अविवाहीत मयत झाला व वादी त्यांचे वारस आहेत हे याठिकाणी सिध्द होत नाही.

२६) वादींनी हे देखील दाव्यात कथन केले की, वादी क्र.१ व मयत तुकाराम यांनी दिनांक १६/१२/२००५ रोजी कायदेशीर गरजेसाठी नाममात्र खरेदीखत ज्ञानदेव शिवराम शिडतुरे यांच्या नावावर केले व त्यानंतर दिनांक ११/१२/२००७ रोजी त्याच व्यक्तीकडे काही मिळकत गहाण ठेवली, त्या व्यवहाराची महसूल नोंद झाली. त्याचप्रमाणे रे.दि.मु.नं.१८१/१९९२, सरुबाई बोडरे यांनी वाटपासाठी व कब्जेसाठी वादी क्र.१ विरुध्द दाखल केला. परंतु, या व्यवहारावरुन केवळ एवढे दिसून येते की, वादी क्र.१ यांचा

वादग्रस्त मिळकतीशी काही व्यवहार झाला होता, परंतु या व्यवहारावरुन मयत तुकाराम हे अविवाहीत होते व त्यांना प्रतिवादी क्र.१ त ४ वारस नव्हते हे सिध्द होत नाही.

२७) वादीचे वकीलांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र.१, २ व ५ हे न्यायालयात हजर झाले, परंतु त्यांनी लेखी कैफियत दिली नाही. तसेच प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या विरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात आला. याशिवाय कोणत्याही प्रतिवादींनी वादी अथवा साक्षीदाराचा उलटतपास घेतला नाही किंवा स्वतःला बचावाचा तोंडी अथवा लेखी पुरावा सादर केला नाही. म्हणून वादीचा संपूर्ण पुरावा अबाधित राहिल्याने, तो सिध्द झाला आहे. परंतु, याठिकाणी केवळ प्रतिवादींनी लेखी कैफियत दिली नाही अथवा वादीचा व साक्षीदाराचा उलटतपास घेतला नाही या कारणावरुन वादीचा दावा आपोआप सिध्द झाला असे म्हणता येणार नाही. वादीने मागितलेल्या दिलासासाठी आवश्यक असलेले सर्व तथ्ये, ग्राहय व कायदेशीर पुरावा वादीला स्वतः सिध्द करणे आवश्यक आहे. पुराव्याचा प्रारंभीक भार हा वादीवरच आहे. प्रतिवादीच्या बचावातील त्रुटी, अनुपस्थीती याचा लाभ वादीला तेव्हाच मिळतो जेव्हा वादी स्वतःचा दावा कायदेशीर पुराव्याने सिध्द करतो. याठिकाणी वादीने स्वतःचा दावा कायदेशीर पुराव्याने सिध्द केला नाही.

२८) वादींनी मयत तुकाराम यांचा मृत्युचा दाखला, वादी क्र.१ व २ मयत तुकाराम यांचे एकमेव वारस असल्याचा कागदोपत्री पुरावा तसेच तुकाराम हे अविवाहीत असून त्यांचा प्रतिवादी क्र.१ ते ४ शी कोणताही संबंध नसल्याचा कागदोपत्री पुरावा पटलावर दाखल केला नाही. त्यामुळे केवळ फेरफार क्र.१७०६ हा वेगळया गट क्रमांकाशी

संबंधीत असल्याच्या आधारावर वादींचा वारसा हक्क सिध्द होत नाही. अशा परिस्थितीत महसूल नोंदीतील त्रुटीमध्ये वादी हे वाद मिळकतीतील वारस असल्याचा घोषणात्मक दिलासा मिळण्यासाठी वादी पात्र नाहीत. जर वादींनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या झालेल्या नोंदी या अवैद्य आहेत हे ठिकाणी सिध्द केले नाही. तर प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी प्रतिवादी क्र.५ यांना करुन दिलेले खरेदीपत्र वादींवर बंधनकारक नाही हे वादींना म्हणता येणार नाही. परिणामी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी प्रतिवादी क्र.५ च्या नावे केलेले खरेदीखत वादींवर बंधनकारक नाही अशी घोषणात्मक आदेश वादींच्या बाजुने देणे योग्य ठरत नाही. त्याचप्रमाणे वादींनी सदरील वाद मिळकती मध्ये प्रतिवादींनी कोणताही हरकत अडथळा करु नये असे देखील कथन केले असले तरी वाद मिळकत ही वादींच्या ताब्यात असल्याबाबत वादींनी कोणताही पुरावा पटलावर दाखल केला नाही. करीता वादींची सदरची मागणी ही या ठिकाणी मंजूर करता येणार नाही. म्हणून मी **मुद्दा क्र.१ ते ६** चे उत्तर **नकारार्थी** देवून, मुद्दा क्र.७ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादीचा दावा खारीज करण्यात येतो.

२. येणे प्रमाणे हुकूमनामा तयार करणेत यावा.
(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला. )

ता. १५/०७/२०२६
कोरेगाव

(पी.डी.यवतकर)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कोरेगाव
ता.कोरेगाव, जि. सातारा.